पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,
चव्हाण नगर, पाषाण, पुणे ४११००८
दुरध्वनी क्र. ०२०-२५६५७८७८
फॅक्स क्र. ०२०- २५६७५६४१
ई मेल sp.pune.r@mahapolice.gov.in-

जावक क्र.पशा-११/शा.वाहनासाठी टायर खरेदी /२०१९ /१९२०८ पुणे दिनांक:-३/१२/२०१९

## निविदा सुचना

विषय :- सिलबंद निवीदा मागविणेबाबत.

पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांचे घटकातील शासकिय वाहनांसाठी वेगवेगळे आकाराचे टायर खरेदी करणेसाठी दोन लिफाफे ई-टेंडर पध्दतीने खाली विहीत केलेल्या अटी व शर्तीना अधीन राहून नोंदणीकृत व्यावसायीक कंपन्याकडून सिलबंद निवीदा मागविण्यात येत आहेत.

**अ) टायरचे वर्णन :-**

| अ.क्र | टायर तपशिल | टायरची संख्या |
|---|---|---|
| १ | tyre with tube 215/75/R15 | 200 नग |
| २ | tubeless tyre 215/75/R15 | 50 नग |
| ३ | Tyre 700 /16 | 20 नग |
| ४ | Tyre 750 /16 | 50 नग |
| ५ | tubeless tyre 235/65 R17 | 08 नग |
| ६ | tyre with tube 100/900-17 | 10 नग |
| ७ | tyre with tube 2.75/17 | 10 नग |
| ८ | tyre with tube 100/90-18 | 10 नग |
| ९ | tyre with tube 2.75/18 | 10 नग |

**ब) अटी व शर्ती :-**

१) निवीदा सादर करणाऱ्या कंपनीने नोंदणी प्रमाणपत्र, पॅन नंबर, सेवाकर/आयकरासंबधीची सांक्षाकित केलेली कागदपत्रे निवीदेसोबत सादर करणे आवश्यक राहील.

२) प्रस्तुतचा करारनामा हा २०१९-२०२०,२०२०-२१ या आर्थिक वर्ष कालावधीकरिता राहील, सदर कराराचा कालावधी वाढविणेचा /कमी करणेचा हक्क कार्यालय राखून ठेवीत आहे.

३) निविदाधारकाचे टायरचे दर शासनाच्या GEM पोर्टल( Government E Market) पेक्षा कमी असावेत.

४) मंजूर निवीदाधारकास मंजूर निवीदा रकमेच्या ५% अनामत रक्कम म्हणून धनाकर्षाने किंवा राष्ट्रीयकत बँकेची बँक गॅरंटी म्हणून कराराच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत निवीदेतील करारनामा करतेवळी रुपये ५०,०००/-(अक्षरी पन्नास हजार फक्त) अनामत रक्कम भरणा करावी लागेल. सदरची अनामत रक्कम बिनव्याजी राहील.सेवा कालावधी विनातक्रार संपल्यानंतर अनामत रक्कम परत केली जाईल. सेवा कालावधीमध्ये सेवा समाधानकारक न दिल्यास अनामत रक्कम जप्त केली जाईल याची नोंद घ्यावी.

५) कार्यालयास व मंजूर निवीदा धारकास मान्य होतील अशा अटी व शर्ती करारनामा करावा लागेल.

६) सदर निवीदेतील अटी व शर्ती यामध्ये बदल करण्याचे अधीकार तसेच निवीदा प्रक्रियेतील काही भाग अथवा पूर्ण निवीदा प्रक्रिया कोणतेही कारण नमुद न करता अगर पुर्वसुचना न देता रद्द करण्याचे अधिकार पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण हे राखून ठेवत आहेत.

७) अपात्र निविदाधारकांची बयाना रक्कम सर्व प्रक्रिया पुर्ण झालेनंतर online पधतीने परत करण्यात येईल.

८) निविदेमध्ये नमुद केलेले टायरची संख्या कमी किंवा जास्त होऊ शकते.निविदाधारकाने दिलेले दरामध्ये टायर पुरविणे बंधनकारक राहील.

९) निविदेमधील सर्व दर हे सर्व करांसह असावेत.

१०. निविदाधारकाला देय रकमेमधुन शासनाच्या नियमाने २% (कींवा लागु असेल त्याप्रमाणे) आयकर (TDS) व २% अतिरिक्त GST कपात करण्यात येईल.

११.निवीदेतील प्रत्येक पान हे निवीदाकार कंपनीने अधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांने स्वयंसांक्षाकिंत करणे आवश्यक राहील.

१२.ज्या निवीदाकाराची तांत्रीक निवीदा छाननी समितीने मंजूर केलेली असेल त्यांचीच व्यावसायीक निवीदा (दरपत्रक) उघडण्यात येईल.

१३.निवीदेसंदर्भातील सर्व निर्णय पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण हे घेतील व ते सर्व निवीदाकार यांचेवर बंधनकारक असतील.

१४.कोणतीही निवीदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क तसेच कोणतेही कारण न देता सदर निवीदा सुचना पुढे ढकलणे किंवा रदद करणे यांचे अधिकार पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांनी राखून ठेवले आहेत.तसेच अशा मंजूर किंवा नामंजूर निवीदेबाबत कोणतेही स्पष्टीकरण पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण हे इतर निवीदाकारांना देणार नाहीत.

१५.अपात्र निवीदाकारांची बयाना रक्कम सर्व प्रकिया पुर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल.

१६.निवीदेमधील दर हे सपुर्ण करार कालावधीसाठी बंधनकारक असतील.

१७.कोणत्याही निवीदेतील कोणतेही दर बाजारभावापेक्षा जास्त असतील तर अशा निवींदाचा विचार केला जाणार नाही.

१८.निवीदेमधील सर्व दर हे सर्व करांसहीत असावेत. कर रचना बदलल्यास त्यासाठी वेगळे पैसे देण्यात येणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

१९. पुरविण्यात आलेल्या टायरच्या Gurantee / Warranty बाबत या कार्यालयाकडे रु. १०० च्या मुद्रांकावर Onsite सेवा पुरविण्यासंदर्भात प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल तसेच सदरच्या टायरच्या पुरवठ्या विषयी रु. ५०० च्या मुंद्राकावर करार करावा लागेल.

**क) निवीदा दाखल करण्याची पध्दती :-**

१) सदर निवीदा ही Online पध्दतीने e-tender द्वारा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ०२ लिफाफा पध्दतीने भराव्यात. तसेच सदर निविदा www.puneruralpolice.gov.in या वेब पोर्टल वर फ़क्त download करण्यासाठी उपलब्ध आहे. सदर निवीदा रुपये १०००/-(अक्षरी एक हजार फक्त ) विनापरतावा चा भरणा ऑनलाईन करुन डाऊनलोड कराव्यात. रुपये १०००/-चा भरणा न करता भरलेल्या निवीदा पात्र ठरणार नाहीत.

२) लिफाफा क्रमांक १ मध्ये तांत्रीक माहीती खालीलप्रमाणे देण्यात यावी.
निवीदाकारांनी सोबत जोडावयाची कागदपत्रे.

a. निवीदा अर्ज फी अर्ज रुपये १०००/- ऑनलाईन भरल्याची पावती. (Transaction ID/Online Receipt)
b. निवीदाकार कंपनीचे पुर्ण नाव व पत्ता दुरुध्वनी व ई मेलसह (कंपनीचे लेटरहेडवर )
c. निवीदाकार कंपनीचे मालकाचे /भागीदारांचे/ संचालकांचे पुर्ण नाव व पत्ते दुरुध्वनीसह (कंपनीचे लेटरहेडवर)
d. निवीदाकार कंपनीचे व्यवसाय नोंदणीप्रमाणपत्र (Company in corporation/ shop Act)
e. निवीदाकार कंपनीचे /मालकाचे PAN Card/ Tan Card
f. निवीदाकार कंपनीचे मागील तीन वर्षाचे Income Tax Return
g. निवीदाकार कंपनीचे GST Registration Certificate.
h. निवीदाकार कंपनी किंवा त्यांचे मालक यांच्यावर कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी कार्यालयामध्ये फसवणूकीची /गैरप्रकाराची किंवा भ्रष्टाचाराची कोणतीही चौकशी चालू/प्रलंबित नसली पाहीजे. तसेच निवीदाकार कंपनीचा समावेश सरकारी काळया यादीत नसला पाहीजे.अशाप्रकारचे प्रतिज्ञापत्र रुपये १००/-च्या स्टॅप पेपरवर देणे बंधनकारक आहे. (नमुना सोबत जोडला आहे.)
i. निवीदा बयाना रक्कम रुपये ५०,०००/-चा ऑनलाईन भरल्याची पावती. (Transaction ID/Online Receipt) जोडणे बंधनकारक आहे

२) लिफाफा क्र. २ व्यावसायीक मध्ये टायरचे दर कंपनीच्या लेटरहेडवर छापील स्वरुपात सही व शिक्यानिशी देण्यात यावेत.

३) उपरोक्त नमुद केलेल्या पध्दतीने सादर न झालेल्या निवीदा नाकारण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

**परिशिष्ट-२ (मालकाचे /भागीदार/संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)**
**प्रतिज्ञापत्र (रुपये १०० च्या मुद्रांकावर)**

मी / आम्ही --------------------------------------------------------(मालकाचे/भागीदारांचे/संचालकांचे नाव व पत्ता )------------ ---------------------------------------- पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांचे घटकाचे शासकिय वाहनांसाठी टायर खरेदीसाठी सेवा संविदा कराराची निवीदा भरत या -------------------------------------------(निवीदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ----------------------- -----------------------या नावाने भरत आहोत. मि/आम्ही तसेच माझी कंपनी यांचेविरोधात कोणत्याही सरकारी कार्यालयामध्ये निवीदा भरण्याच्या दिनांक रोजीपर्यंत कोणतीही गैरप्रकार, अफरातफर, गैरव्यवहार, फसवणूक तसेच भ्रष्टाचार याविषयी कोणतीही चौकशी चालू नाही किंवा प्रलंबित नाही. तसेच अशा प्रकारची कोणतीही चौकशी माझे /आमचे जवळचे नातेवाईक (आई/वडील/पत्नी/पती/भाऊ /बहीण ) यांचेविरोधात सुध्दा चालू नाही.

सही
निवीदाकार कंपनीचे मालक/भागीदार/संचालक

**परिशिष्ट - ३ (मालकाचे / भागीदार / संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)**
**प्रतिज्ञापत्र (रु. १०० च्या मुद्रांकावर)**

मी / आम्ही ------------(मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे नाव व पत्ता)------------------------------------ पोलीस अधिक्षक पुणे ग्रामिण घटकाचे शासकिय वाहनांसाठी टायर/टयुबच्या पुरवठ्याची निविदा या ---------------- (निविदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ------------ नावाने भरत आहोत. निविदेमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे टायर/टयुबचा पुरवठा व सेवा Warranty / Guaranty कालावधीमध्ये मोटार परिवहन विभाग यांच्या कडे Onsite पध्दतीने २४ तास ~~[illegible]~~

सही
निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक

ड) **निवीदा दाखल करणे/निवीदा उघडणे याबाबतचा तपशील :-**

| | | |
|---|---|---|
| १ | निवीदा मागविण्याचा दिनांक | दिनांक.०४ /१२/२०१९ ते दि.२४ /१२ /२०१९ |
| २ | निवीदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २५ /१२/२०१९ दुपारी १२.०० वाजेपर्यंत |
| ३ | निवीदा पुर्व बैठक (Pre Bid Meeting) | दिनांक २५/१२/२०१९ दुपारी १५.०० वाजता पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालयात होईल. |
| ४ | निवीदा उघडण्याचा दिनांक व वेळ | तांत्रीक निवीदा-दिनांक २८/१२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता हजर निवीदाकार यांचे प्रतिनिधीसमोर ऑनलाईन उघडण्यात येतील.<br>व्यावसायीक निवीदा-ज्या निवीदाकारांच्या तांत्रीक निवीदा मंजूर होतील, अशा निवीदाकारांना व्यावसायीक निवीदा उघडण्याचा दिनांक व वेळ कळविले जाईल.(दोन्ही निवीदा ऑनलाईन पध्दतीने उघडण्यात येतील.) |
| ५ | संपर्क अधिकारी | १.श्री.एस.डी.आकळे, पोलीस निरिक्षक ,मोटार परिवहन विभाग पुणे ग्रामीण.भ्रमणध्वनी क्रमांक ९८२३६११८३८<br>२.सौ.एम.बी.दुधाळ,व.श्रे.लिपीक पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण कार्यालय भ्रमणध्वनी क्रमांक ९०२१०९१५४८ |

प्रस्तावीत करारासंबधी काही शंका असल्यास त्याच्या निराकरणासाठी पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालयात उपरोक्त नमुद केलेल्या संपर्क अधिकारी यांचेशी कार्यालयीन वेळेत संपर्क करावा तसेच E Tender विषयी काही शंका असल्यास एनआयसीच्या १८००३०७०२२३२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

ई -निवीदा पध्दतीने निवीदा भरतांना कांही अडचणी आल्यास (इंटरनेट सेवा बंद असणे/लाईट जाणे इत्यादी ) व त्यामुळे अपुर्ण निवीदा भरली गेल्यास त्याला हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच अशा प्रकारच्या कोणत्याही समस्या निर्माण झाल्यास त्याची कोणतीही दखल घेतली जाणार नाही याची सर्व निवीदाकारांनी नोंद घ्यावी.

**लखोटा क्र.१(तात्रिक)उघडण्याबाबत-**

लखोटा क्र.१(तात्रिक) हा दि.०१/१२/२०१६ च्या उद्योग व उर्जा विभागाकडील शासन निर्णयातील सुचनेनुसार गठीत केलेले समितीसमोर E-Tender प्रणालीमार्फत उघडण्यात येईल.तसेच त्यासाठी निविदाकारांना आमंत्रित केले जाईल.निविदाकार स्वत: किंवा त्यांचे प्रतिनिधी सदर वेळी उपस्थित राहु शकतात.सदर ई-निविदा तात्रिक अडचणीमुळे निविदाकार यांच्या समोर उघडण्यात येतीलच असे नाही. यंत्रणेच्या उपलब्धतेनुसार पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये किंवा राष्ट्रीय सुचना केंद्र (NIC) या ठिकाणी उघडल्या जातील.त्यासंदर्भात कोणतीही तक्रार चालणार नाही.जे निविदाकार उपस्थित राहणार नाहीत त्यांना सदर प्रक्रियेमध्ये कोणतीही तक्रार करता येणार नाही. तसेच लखोटा क्र.१(तात्रिक) मधील सर्व कागदपत्रांची तपासणी समितीमार्फत केली जाईल.त्यासाठी गरज असलेस जास्तीचा वेळ मागुन घेण्यात येईल.कागदपत्रांची तपासणी निविदाकारांसमोरच करण्याचे बंधन समितीवर नसेल.समितीच्या वेळेनुसार व गरजेनुसार कागदपत्रांची छाननी व तपासणी केली जाईल तसेच त्याबाबतीत अंतिम निर्णय पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण हे समितीचे अध्यक्ष या नात्याने घेतील व तो निर्णय सर्वांवर बंधनकारक असेल.समितीचा निर्णय यथावकाश सर्व निविदाधारकांना कळविण्यात येईल.

नोट: -पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण कार्यालय हे कायदा व सुव्यवस्थेचे दृष्टीने अत्यंत महत्वाचे काम करित असल्यामुळे निविदा उघण्याची दिलेली तारिख व वेळ कधीही बदलु शकते याची नोंद घ्यावी.

**निविदा वैधता कालावधी -**

निविदेचा वैधता कालावधी तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर किमाण २१ दिवस असेल. २१ दिवसापेक्षा कमी कालावधी दर्शविलेल्या निविदा नाकारण्यात येतील.

**निविदा प्रक्रियेबाबत अथवा निविदा सादर केलेल्या निविदा धारकांबाबतचे तक्रारीबाबत.-**

निविदा प्रक्रियेमध्ये निविदा सादर केलेल्या निविदाधारकांवर तक्रार दाखल करणा-या तक्रार धारकास रु.५००००/-इतकी अनामत रक्कम कार्यालयाकडे जमा करावी लागेल.जर तक्रारीमध्ये तथ्य आढळलेस संबंधीत तक्रारदाराची अनामत रक्कम परत करुन आरोप सिध्द झालेले निविदाधारकास निविदा प्रक्रियेमधुन वगळण्यात येऊन त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.(उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-२०१४/प्रक्र.८२/उद्योग -४,दि.१/१२/२०१६ मधील ५.८.२,नुसार पा.क्र.७६ )

**निविदा प्रक्रियेबाबतचे स्पष्टीकरण:**

निविदा प्रक्रियेबाबत काही शंका अथवा तक्रारी असल्यास संबंधीत निविदाकाराने अथवा निविदा भरु इच्छिना-या निविदाकारांनी सदरची शंका अथवा तक्रार निविदा भरण्याच्या अंतिम दिनांक व वेळेपुर्वी किमान २ दिवस अगोदर लेखीस्वरुपात या कार्यालयास सादर करावी.त्यानंतर आलेल्या कोणत्याही शंका अथवा तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.

**( संदीप पाटील )भापोसे**
पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण